## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३.

प्रति,

सर्व विभागीय उपआयुक्त/अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क.

क्रमांक:- डिवायएस ११२००५/४०९५९ /चार — मुंबई, दि. १८ मार्च, २०१८.

विषय:- याचिका क्र.८५४८/२००४ मधील मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.१३.१२.२०१७ रोजीच्या आदेशानुसार मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ अंतर्गत येणाऱ्या सर्व अनुज्ञप्तींच्या सन २०१८-१९ करिता नुतनीकरणाची कार्यवाही स्थगित ठेवण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सर्वश्री अर्स बायोफ्युअल प्रा.लि., या नमुना "I" व डिएस-५ अनुज्ञप्तीधारकाने मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.८५४८/२००४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.१३.१२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये मुंबई विप्रकृत मद्यार्क नियम १९५९ मधील नियम २३ ते ६२ रद्द केलेले आहेत. त्यामुळे विप्रकृत मद्यार्क बाळगणे, वापर, विक्री, आयात, निर्यात आणि वाहतुक यावर राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण रहाणार नाही. तसेच विप्रकृत मद्यार्कासाठी राज्याची कोणतीही अनुज्ञप्ती घेण्याची आवश्यकता राहिलेली नाही. मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.१३.१२.२०१७ रोजी दिलेल्या आदेशा विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यासाठी शासनास प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तरी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

( डॉ. अश्विनी जोशी )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Dr. Mohd. Furqan Mohd. Yusuf
DEAN
DKMM Homoeopathic Medical
College & Hospital, Aurangabad